आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१४ मे २०२५ -बुधवार

**ठळक बातम्या**

- ऑपरेशन सिंदूरचं देशोदेशीच्या संरक्षणविषयक तज्ज्ञांकडून कौतुक

- अरुणाचल प्रदेशातल्या ठिकाणांची नावं बदलण्याचे चीनचे प्रयत्न निराधार आणि निष्फळ असल्याचं भारताचं प्रतिपादन

- भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांचा शपथविधी

- संघ लोक सेवा आयोगाच्या अध्यक्षपदी डॉ. अजय कुमार यांची नियुक्ती

**आणि**

- खेलो इंडिया स्पर्धेत १२२ पदकं मिळवून महाराष्ट्र अव्वल स्थानी कायम

**<><><><><>**

दहशतवादाविरोधात भारताने राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरचं देशोदेशीच्या संरक्षण विषयक तज्ञांनी कौतुक केलं आहे. अमेरिकेचे माजी लष्करी अधिकारी डॉन स्पेन्सर यांनी म्हटलंय की पहलगाम हल्ल्यानंतर भारताने अजिबात वेळ न दवडता सूडभावनेने नव्हे तर जरब बसवण्यासाठी ही कामगिरी केली. हा केवळ हल्ल्याला प्रतिसाद नव्हता तर धोरणात्मक समीकरणातला मोठा बदल होता असं त्यांनी सांगितलं. ऑस्ट्रियातले तज्ञ लेखक टॉम कूपर यांनी या नेमक्या हालचालींबद्दल तसंच हवाई दल आणि लष्कराच्या योग्य वापराबद्दल या कारवाईची प्रशंसा केली आहे. दहशतवादाविरोधात लढताना अण्वस्त्रांच्या धमकीसमोर न झुकण्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भूमिका प्रशंसनीय असल्याचा उल्लेख दोन्ही तज्ज्ञांनी आपापल्या समाज माध्यमावरच्या लिखाणात केला आहे.

<><><><><>

भारतीय सशस्त्र दलांनी राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरने जगाचे लक्ष वेधलं आहे. या मोहिमेच्या यशस्वितेमागे आकाशतीर ही हवाई संरक्षण प्रणाली असून या प्रणालीने पाकिस्तानी ड्रोन, क्षेपणास्त्रं तसंच अन्य शस्त्रांस्त्रांना रोखण्यात आणि निष्क्रीय करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. पूर्णपणे स्वदेशी बनावटीची ही एआय आधारित प्रणाली असून ही भारताच्या वाढत्या तांत्रिक स्वावलंबनांच प्रतीक आहे.

<><><><><>

देशाच्या तिन्ही संरक्षण दलांच्या मुख्य अधिकाऱ्यांनी आज नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. संरक्षण दल  प्रमुख जनरल अनिल चौहान, लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, हवाईदल प्रमुख एअरचीफ मार्शल ए.पी. सिंग, आणि नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांनी राष्ट्रपतींना ऑपरेशन सिंदूरबाबत माहिती दिली. दहशतवादाचा मुकाबला करताना सेनादलांनी दाखवलेल्या समर्पण आणि शौर्याचं राष्ट्रपतींनी कौतुक केलं.

<><><><><>

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने कालपासून देशभर तिरंगा यात्रेचं  आयोजन केलं आहे. मोदी सरकारचं खंबीर नेतृत्व आणि सैन्य दलांचं शौर्य लोकांपर्यंत पोहोचवणं हा या तिरंगा यात्रेचा उद्धेश आहे. येत्या २३ मे पर्यंत तिरंगा यात्रा देशभर सुरू राहणार असून यामध्ये सैन्य दलांचे निवृत्त अधिकारी कर्मचारी आणि अनेक सामाजिक कार्यकर्तेही सहभागी होणार आहेत.  दक्षिण मुंबईतल्या ऑग्स्ट मैदानातून आज मुंबई भाजपातर्फे तिरंगा यात्रेचं आयोजन केलं आहे.

<><><><><>

पंजाबमध्ये फिरोझपूर क्षेत्रात चुकून आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडणाऱ्या सीमा सुरक्षा दलाच्या जवानाला आज पाकिस्ताननं भारताकडे सुपूर्द केलं. अमृतसरजवळच्या अटारी संयुक्त चौकीजवळ हस्तांतरणाचा कार्यक्रम शांततेत झाला, असं जालंधर इथल्या आकाशवाणी प्रतिनिधीनं कळवलं आहे. सीमावर्ती भागातल्या शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी तैनात पथकातला हा जवान २३ एप्रिलला चुकून सीमापार क्षेत्रात गेला असता पाकिस्तानी सैन्यानं त्याला ताब्यात घेतलं होतं.

**<><><><><>**

अरुणाचल प्रदेशातल्या ठिकाणांची नावं बदलण्याचे चीनचे  प्रयत्न अजूनही चालू असून ते निराधार आणि निष्फळ असल्याचं भारतानं म्हटलं आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ता रणधीर जयस्वाल यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितलं, की हे चीनचे प्रयत्न भारताला पूर्णपणे अमान्य आहेत. अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य आणि अभिन्न हिस्सा होता, आहे आणि राहील तसंच कोणत्याही सर्जनशील नामकरणामुळे हे सत्य बदलू शकत नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांचा शपथविधी आज नवी दिल्लीच्या राष्ट्रपती भवनात झाला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पदाची शपथ दिली.

**होल्ड -बाईट**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, तसंच केंद्रीय मंत्रिमंडळाचे इतर सदस्य आणि सर्वोच्च न्यायालयातले इतर न्यायाधीश या समारंभाला उपस्थित होते.

**<><><><><>**

राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू यांनी डॉ. अजय कुमार यांची संघ लोक सेवा आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. कार्मिक आणि प्रशिक्षण विभागानं जारी केलेल्या आदेशानुसार, अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्यावर डॉ. कुमार यांचा कार्यकाळ सुरु होईल. डॉ. कुमार भारतीय प्रशासकीय सेवेतून निवृत्त झाले आहेत. ते १९८५ च्या तुकडीतले केरळ केडरचे अधिकारी आहेत. त्यांनी यापूर्वी संरक्षण सचिव म्हणून काम पाहिलं आहे.

**<><><><><>**

मुंबई मेट्रोच्या कामापैकी ५० किलोमीटरचे टप्पे या वर्षी, तर ६२ किलोमीटरचे टप्पे पुढच्या वर्षअखेरपर्यंत पूर्ण करू, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिलं. फडणवीस यांच्या उपस्थितीत दहिसर ते काशीगाव या मेट्रोच्या टप्प्याची तांत्रिक तपासणी आज झाली, त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

**<><><><><>**

संपूर्ण राज्य रेल्वेफाटकमुक्त करायच्या उद्देशानं महारेलनं राज्यभरात मोठ्या प्रमाणात रेल्वे पूल बांधण्याचं काम हाती घेतलं असून यापैकी ३२ पूल पूर्ण झाले आहेत, तर या वर्षी २५ पूल पूर्ण होतील, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिली.

**<><><><><>**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती संभाजी महाराजांना वंदन केलं आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारने दरवर्षी 23 सप्टेंबर हा दिवस आयुर्वेद दिन म्हणून अधिकृतपणे जाहीर केला आहे. आगामी दहा वर्षांच्या काळात धनत्रयोदशीची तारीख १५ ऑक्टोबर ते १२ नोव्हेंबरमध्ये बदलत राहणार असल्यामुळे आयुर्वेद दिनाच्या कार्यक्रमांच्या आयोजनात अडचणी येऊ नयेत म्हणून हा निर्णय घेतल्याचं आयुष मंत्रालयानं कळवलं आहे.

<><><><>

पंजाबमध्ये विषारी दारू प्यायल्याने मरण पावलेल्यांचा आकडा २३ वर पोहोचला आहे. यात दुर्घटनेतल्या १३ जणांवर अद्यापही उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती स्थानिक रुग्णालयाने दिली आहे. अमृतसरच्या मजिठा इथे काल ही दुर्घटना घडली. मुख्यमंत्री भगवंत मान यांनी दोषींवर कठोर कारवाई करण्याचं आश्वासन दिलं असून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी १० लाख रुपये आर्थिक मदतीची घोषणाही केली आहे.

<><><><>

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत, आज महाराष्ट्राने आणखी एक सुवर्ण आणि एक रौप्य पदक मिळवल्यानं एकूण पदक संख्या १२२ झाली आहे. स्पर्धेच्या १० व्या दिवशी काल महाराष्ट्राच्या खेळाडूंनी पदकांची शतकपूर्ती केली . सध्या ४७ सुवर्ण आणि ३९ रौप्य आणि ३६ कांस्य पदकं मिळवून महाराष्ट्र पदक तालिकेत अव्वल स्थानावर आहे. १९ सुवर्ण आणि ९ रौप्य पदकांसह ४२ पदकं मिळवून राजस्थान दुसऱ्या तर हरियाणा तिसऱ्या स्थानावर आणि कर्नाटक चौथ्या स्थानावर पोहोचला आहे. खेलो इंडिया स्पर्धेचा आज ११वा दिवस असून उद्या समारोप होईल.

<><><><>

थायलंड इथे सुरु असलेल्या खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय बॅडमिंटनपटू आकर्षि कश्यप आणि उन्नती हुडा आज सकाळी उप उपांत्यपूर्व फेरीत पोहोचल्या.

आकर्षि कश्यप हिने महिलांच्या एकेरी स्पर्धेत जपानच्या कावरु सुगियामा हिला नमवलं तर उन्नती हुडा हिने थायलंडच्या तामोनवान निथीटीकाराय हिला हरवलं. पुरुष एकेरीत भारताच्या लक्ष सेन ला पराभवाला सामोरं जावं लागलं.महिला दुहेरीत आज भारताच्या गायत्री गोपीचंद आणि ट्रेसा जॉली यांचा सामना मलेशियाच्या कार्मेन टिंग आणि ओंगक्षींयि यांच्याशी होईल.

**<><><><><>**

आसाम आणि मेघालयात तुरळक ठिकाणी आज मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागानं व्यक्त केली आहे. मात्र उत्तर प्रदेशाचा पूर्वेकडचा भाग, गंगेजवळचा पश्चिम बंगाल आणि झारखंड इथे आज उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे.

येत्या तीन दिवसांत आसाम, मेघालय, अरुणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, त्रिपुरा इथे मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसंच या कालावधीत मध्य प्रदेश, विदर्भ, छत्तीसगढ, पश्चिम बंगाल, सिक्कीम , बिहार इथे मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह वेगवान वारे वाहण्याची तसंच हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**